# मिरा भाईंदर महानगरपालिका

## हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी व वायू प्रदूषण कमी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

**संदर्भ : १. मा. उच्च न्यायालयाच्या PIL No. 3 of 2023 पर्यावरण विभाग मागदर्शक सूचना.**

**२. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण नवी दिल्ली प्रिन्सिपल यांचेकडील ओरिजिनल एप्लिकेशन क्र. ६८७/२०२३ आदेश.**

**३. मा. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचेकडील दि. २७/१०/२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**

### १. बांधकाम आणि पाडकाम करावयाच्या ठिकाणी अवलंबण्याच्या उपाययोजना :

- सर्व बांधकाम व्यावसायिकांनी बांधकाम प्रकल्पांच्या परिघाभोवती किमान २५ फूट उंच टिन/ धातूचे पत्रे उभे करावेत.
- १ एकरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या सर्व बांधकाम आरेखनामध्ये बांधकाम प्रकल्प साइटच्या परिघाभोवती २५ फूटांपेक्षा जास्त उंचीची टिन/मेटल शीट उभारलेली असावी, १ एकरपेक्षा कमी बांधकाम क्षेत्रावर टिन/मेटल शीटची उंची किमान २५ फूट असावी.
- बांधकाम / पाडकाम होत असलेल्या सर्व इमारतींना हिरव्या कापडाने / तागाच्या पडद्याने / ताडपत्रीने वरपासून खालपर्यंत चारही बाजूंनी बंदिस्त केले पाहिजे.
- धूळ नियंत्रणासाठी बांधकाम/उद्वस्त करण्याच्या जागेवर पाणी शिंपडणे/फवारणी करणे आवश्यक आहे. यासाठी Mist Spray मशिन बसवावी.
- बांधकामाच्या ठिकाणी सामग्री संचय करताना आणि अनलोड करताना पाणी फवारणी करायला हवे. (स्टेशनरी/मोबाईल अँटी स्मॉग गन वापर/Mist Spray Machine)
- मलबा/ रेती, सिंमेट, चुना, वीटा असे बांधकाम साहित्य जे साइट्सवर हवेतून पीएम कण तयार करण्यास कारणीभूत असतात अश्या ठिकाणी अनिवार्यपणे पाणी शिंपडणे आवश्यक आहे
- सर्व बांधकाम कर्मचारी/व्यवस्थापकांनी अनिवार्यपणे वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की संरक्षक मुखवटे , गॉगल, हेल्मेट इ. परिधान करणे आवश्यक आहे.
- बांधकाम/ पाडकाम साहित्य वाहून नेणारी वाहने बंदिस्त असावीत. त्यामुळे हवेतील धूळ टाळता येईल. (म्हणजे, वरपासून ते सर्व बाजूंनी झाकलेले असावे.)
- धूळ/कणांचे उत्सर्जन टाळण्यासाठी सर्व साहित्य साठवण पुरेशा प्रमाणात झाकले जातील याची खबरदारी घ्यावी.

- सर्व कामाच्या ठिकाणांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की ग्राइंडिंग, कटिंग, ड्रिलिंग, सॉइंग आणि ट्रिमिंगचे काम बंदिस्त भागात केले जाते आणि प्रदूषित हवेपासून बचाव करण्यासाठी काम करताना पाण्याचे स्प्रिंकलर / पाणी फवारणी सतत करावे.
- सर्व बांधकाम स्थळी परिसरात / कामाच्या ठिकाणी निर्माण होणारा C&D (बांधकाम आणि पाडणे) कचरा C & D प्रक्रिया केला जाईल याची दक्षता घ्यावी.
- जमिनीवरील मेट्रोची सर्व कामे २५ फूट उंचीच्या बॅरिकेडिंगने झाकली जातील. बांधकामाची जागा ताडपत्री/हिरव्या कापडाने/ज्युट शीटने झाकलेली असावी. स्मॉग गन / वॉटर स्प्रिंकलर बांधकाम कामाच्या दरम्यान वापरावे.
- सैल माती, वाळू, बांधकाम साहित्य आणि कोणत्याही प्रकारचे आणि प्रमाणातील मोडतोड सीमांकित / समर्पित क्षेत्रामध्ये आणि योग्यरित्या बॅरिकेड केलेले, पूर्णपणे झाकलेले / बंद केलेले / ताडपत्रीने संरक्षित केले जावे.

**डीजी सेटसाठी करावयाच्या उपाययोजना :**

- डीजी संचांचा वापर केवळ वीज बिघाड झाल्यास आणि सीपीसीबी नियमांनुसार होईल.
- डीजी सेटची योग्य देखभाल केली जाईल याची सर्व औद्योगिक संस्था सहकारी सोसायटी यांनी दक्षता घ्यावी.

**२. बांधकाम आणि पाडकाम साहित्य वाहून नेणा-या वाहनांसाठी आचारसंहिता**

- वाहनातून कोणतीही गळती टाळण्यासाठी बांधकाम / पाडण्याचे साहित्य वाहून नेणारी वाहने ओव्हरलोड करू नयेत.
- सर्व बांधकाम साइट्सनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत.
- साहित्य/भंगार उतरवल्यानंतर, वाहन पूर्णपणे धुवून स्वच्छ केले पाहिजे यासाठी यंत्रणा बसवावी.
- साइटवर येण्यापूर्वी आणि सोडण्यापूर्वी वाहनांची चाके धुणेची खबरदारी घ्यावी.
- साइटमधील धूळ उत्सर्जन कमी करण्यासाठी साइटमधील वाहनांचा मार्ग पूर्वनिर्धारित आणि संक्षिप्त केला जाईल.
- साइटवरील वाहनाचा वेग २० किमी/तास पेक्षा जास्त राहणार याची खबरदारी घ्यावी.
- वाहतूक सुरळीत होण्यासाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था आणि योग्य वाहतूक व्यवस्था असणे गरजेचे आहे.
- वैध 'पोल्युशन अंडर कंट्रोल (PUC) सर्टिफिकेट' असलेल्या वाहनांना साइटवर परवानगी दिली जाईल. सर्व वाहनांचे पीयूसी सुरक्षा तपासणी केंद्रावर तपासले जाईल आणि त्यानंतरच वाहनांना साइटवर प्रवेश दिला जाईल.
- विद्यमान रहिवासी आणि बांधकाम वाहनांसाठी स्वतंत्र प्रवेश आणि निर्गमन सुरळीत वाहतूक सुनिश्चित करेल.
- संभाव्य परिणामांचा अंदाज लावण्यासाठी वाहतूक विश्लेषण केले जावे.
- सर्व बिल्डर्स/डेव्हलपर्स यांनी वाहन ट्रॅकिंग सिस्टीम बसवावी.

- बांधकाम साहित्य किंवा C&D साहित्य वाहून नेणारी वाहने, वर नमूद केलेल्या तरतुदींचे पालन करत नसल्याचे आढळल्यास, ते जप्त करणेची त्यांच्यावर कारवाई यावी.

३. **शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका यांनी हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी करावयाची उपाययोजना :**

- सार्वजनिक रस्ते, पदपथ, फुटपाथ आणि मोकळ्या जागेवर बांधकाम साहित्य आणि भंगार कचरा टाकला जाणार नाही याची खात्री केली जाईल.
- महानगरपालिका क्षेत्रांतर्गत सर्व रस्त्यांना पक्के फूटपाथ करणेची बांधकाम विभागानी दक्षता घ्यावी.
- पर्यावरणास अनुकूल पध्दतीने अंत्यसंस्कार करणेसाठी विद्युतवाहिनी / CNG PNG स्मशानभूमी उभे करणेची दक्षता घ्यावी.
- बेकरी/हॉटेल्सना PNG / विद्युतचा वापर करणेस बंधनकारक करावे.
- घनकचरा व्यवस्थापन विभागाने अवैध डेब्रीज भरणा, C & D कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करणेसाठी विशेष पथके तैनात / निर्माण करावीत.
- प्रभाग क्षेत्र स्तरावरील सहाय्यक आयुक्त यांनी वायुप्रदूषण कमी करण्याच्या अंमलबजावणीसाठी एक पथक तैनात / निर्माण करावेत. यामध्ये,

    a) कनिष्ठ अभियंता

    b) स्वच्छता निरिक्षक

    b) लिपिक

    c) सुरक्षा रक्षक नेमावेत. त्यांनी प्रभाग क्षेत्रात पाहणी करुन कारवाई करावी.
- **पथकाचे कामाचे स्वरुप :** अंमलबजावणी पथक परिसराला भेट देईल आणि कार्यस्थळाची व्हिडिओग्राफी करेल. कार्यस्थळ वर नमूद केलेल्या तरतुदींचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आल्यास, काम थांबवा नोटीस जारी करणे आणि/किंवा कार्यस्थळ सील करणे यासारखी कठोर कारवाई तात्काळ केली जाईल.
- महानगरपालिकेंतर्गत असलेल्या भौगोलिक क्षेत्रात, विशेषत: कचरा डंपिंग ग्राउंड आणि कचरा जाळण्याच्या संभाव्य ठिकाणी कुठेही उघड्यावर जाळण्यावर पूर्ण बंदी असेल.
- याठिकाणी कचरा जाळण्यास पूर्णपणे बंदी राहिल तसे आढळल्यास संबंधितांस कारवाई करावी.
- हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी पर्यावरण विभागाने नागरिकांमध्ये जनजागृती करणेची दक्षता घ्यावी.

उपरोक्त मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणेत यावी. जेणेकरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारणेस व नागरिकांचे आरोग्य सुधारणेस मदत होईल.

**(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**